महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.११६०/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०२ नोव्हेंबर, २०१८.

प्रस्तावना :- मराठा विद्या प्रसारक समाज,नाशिक संचलित उदोजी होरायझन स्कूल,उदोजी मराठा बोर्डिंग कॅम्पस,गंगापूर रोड, नाशिक,ता.जि.नाशिक या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत मराठा विद्या प्रसारक समाज,नाशिक संचलित उदोजी होरायझन स्कूल,उदोजी मराठा बोर्डिंग कॅम्पस,गंगापूर रोड, नाशिक,ता.जि.नाशिक या नवीन प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळेस (इ.१ली ते १२ वी , इंग्रजी माध्यम,सर्व शाखा, सी.बी.एस.ई.), सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन शाळा स्थापन करण्यासाठी खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती-

१) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसा सी.बी.एस.ई मंडळाशी संलग्नते करिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस

मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) , रत्नागिरी यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

६) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

७) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

०२/०१/२०१८

(रा.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक,नाशिक,
६. शिक्षणाधिकारी जि.प. (प्राथमिक / माध्यमिक), नाशिक,

To grant permission to start new school for the academic year 2018 – 19 under the provisions and principles of Maharashtra Self-Help School [Establishment] and Regulations] Act, 2012

MAHARASHTRA GOVERNMENT

SCHOOL EDUCATION & SPORTS DEPARTMENT

GOVT. DECISION NO. SFS-1018/Pr.Kra.1160/SM-2

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032

Date : 02 November, 2018

Proposal :- A proposal has been putforth to grant approval for the establishment of new school on the basis of Self-help to Udoji Maratha Boarding Campus, Gangapur Road, Nashik affiliated to Maratha Vidya Prasarak Samaj, Nashik. The said proposal is under consideration by the Govt. to give recognition.

Govt. decision

2.1 The Govt. hereby gives approval to start the new school Primary to Higher Secondary [ Std. 1st to 12th, English Medium, all divisions, C.B.S.E. ] for the academic year 2018 – 19 on the basis of Self-help to Udoji Maratha Boarding Campus, Gangapur Road, Nashik affiliated to Maratha Vidya Prasarak Samaj, Nashik. The following terms and conditions will be binding upon them to start the new school.

1] The said school shall abide by all the rules and regulations under the provisions of Children Free and Compulsory Education Act, 2009.

2] The concerned management of school shall abide by all the rules and regulations as per Act 2009. The permission [letter of intent] has been granted to start school in academic year 2018 – 19 as per the following details :-

NOTARY
A. S. RUMANE
AREA DIST. NASHIK
MAHARASHTRA
REGD. No. 8061
Expiry Date
23/6/2025
GOVT. OF INDIA

[a] As per the Govt. prescribed rules if all the formalities are complete, the management should make an application before one month from starting of the academic year to the concerned District Education Officer for establishment of the new school.

[b] As per the Govt. decision the management is eligible for the year 2018 – 19 for establishment of the school. The permission to start the school shall automatically stand cancelled if all the formalities have not been completed before 18 months from the date of Govt. decision.

[c] As per the prescribed Govt. decision dated 20 June, 2012 for attachment of all round Universal policies of C.B.S.E. first of all No Objection Certificate should be obtained by the school. It is necessary to obtain the Recognition for the same. As per the Govt. decision in para [10] and after receiving the Letter of Recognition of attachment regarding the concerned management from the District Education Officer [Primary]/District Education Officer [Secondary], Ratnagiri, an application should be made to the Govt. for obtaining No Objection Certificate. The Govt. shall give the No Objection Certificate if the formalities are completed and after the completion of the prescribed criteria, terms and conditions and after scrutiny of the said application the Govt. shall give the No Objection Certificate for attachment to the School.

3] The permission given to the new school i] Should abide by the Govt. Orders issued and procêdures time to time and so also ii] Make compliance and abide under the provisions and principles of Maharashtra Self - Help

NOTARY
A. S. RUMANE
AREA DIST. NASHIK
MAHARASHTRA
REGD. No. 8061
Expiry Date
23/6/2025
GOVT. OF INDIA

School [Establishment] and Regulations] Act, 2012 [ Year 2013 of 1].

4] The relevant Competent Authority should make sure about the provisions and completion of the formalities made therein of the said Act 2009 and then only make further proceedings to give the first recognition approval.

5] In future the management cannot make any changes in the medium and location of the school for which they have demanded for permission. The School cannot make changes in the place accorded to them other than the place for which Govt. has given permission to start the school. If the school is started in any other place then the permission given by the Govt. shall automatically stand cancelled.

6] U-DISE Data :- While filling the information as per the decision given by this Govt. regarding new school / upgrading school District wise U-DISE [Unified District Information System for Education] it should be mentioned as " Permitted Self-Help School ". The said management will be responsible to get the entries made in separate category and get the number of the entry. For making further action the State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai has been declared as The Nodal Officer. Similarly the management is required to put an public panel advertisement in the entrance of school as - <u>" Permitted Self-Help School / Upgrading School ".</u>

NOTARY
A. S. RUMANE
AREA DIST. NASHIK
MAHARASHTRA
REGD. No. 8061
Expiry Date
23/6/2025
GOVT. OF INDIA

7] The teaching and non teaching staff should be appointed as per the prevailing rules and as per the policy of the permission granted to the Permitted Self-Help School.

3. The Deputy Director, Education Department will be responsible to inform the said order to the concerned management within 15 days.

As per the Order and name of the Maharashtra Governor.

Sd/-xxx

[R.V.Kudale]

Working Officer, Maharashtra Govt.

Copy

1. Commissioner [Education], Maharashtra State, Pune
2. State Project Directorate, Maharashtra Primary Education Council, Mumbai
3. Director of Education, [Secondary and Higher Secondary], Maharashtra State, Pune
4. Director of Education, [Primary] Maharashtra State, Pune
5. Divisional Dy. Director, Nashik
6. Education Officer, Z.P., [Primary/Secondary], Nashik

CGupta

Translated by : C.G. Gupta

ATTESTED

ASHOK S. RUMANE
Advocate & Notary Govt. of India
Madhushri Apt., D. K. Nagar, Gangapur Road, Nashik. Mob. : 9822289184

NOTARY
A. S. RUMANE
AREA DIST. NASHIK
MAHARASHTRA
REGD. No. 6061
Expiry Date
23/6/2025
GOVT. OF INDIA